# Media Coverage

**Manipur Times**
21 July 2020

Nanoscience Professor from Manipur innovated 'Virus Kavach' Fabric Spray for Inactivating CORONA Virus

http://firstne.in/.../nanoscience-professor-from-imphal.../1298/




FIRSTNE.IN

**Nanoscience Professor from Imphal innovated 'Virus Kavach' Fabric Spray for Inactivating CORONA Virus - First NE**

## डॉ. तुकाराम डोंगळे यांची 'यंग असोसिएट'पदी निवड



डॉ. डोंगळे

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲंड बायोटेक्नॉलॉजीचे प्रा. डॉ. तुकाराम डोंगळे यांची 'महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स'च्या 'यंग असोसिएट' या प्रतिष्ठेच्या पदावर निवड झाली.

डॉ. डोंगळे विद्यापीठात आठ वर्षांपासून कार्यरत असून, त्यांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे त्यांची निवड केली आहे. या वर्षीच्या गुणांकनात 'इंजिनिअरिंग ॲंड टेक्नॉलॉजी' क्षेत्रात त्यांची निवड केली. त्यांनी एमएससी. (इलेक्ट्रॉनिक्स) करत असताना सेट व नेट परीक्षांत महाराष्ट्रासह देशात सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होण्याचा विक्रम नोंदवला आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठामधून पीएच.डी. पूर्ण करून, दक्षिण कोरियातील कोरिया विद्यापीठामधून पोस्ट-डॉक्टरेट संशोधन पूर्ण केले.

आजवर त्यांचे सत्तरहून अधिक शोधनिबंध विविध आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन प्रकल्प पूर्ण केलेल्या जवळजवळ पंचवीसहून अधिक विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, इस्राईल, इटली आदी देशांत उत्कृष्ट विद्यावेतनासह पीएच.डी. करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

## 'हायस्पीड ओव्हरहेड स्टीरर' भेट

### सेराफ्लॅक्स कंपनीचे दायित्व; नॅनो टेक्नॉलॉजीच्या संशोधनाला बळ



## नॅनो टेक्नॉलॉजी एक स्वप्नवत भविष्य : डॉ. कसबे

### उत्तूर येथील पार्वती-शंकर विद्यालयातील बालवैज्ञानिक संमेलनाची सांगता

उत्तूर : पुढारी वृत्तसेवा

नॅनो तंत्रज्ञान आज रुजत आहे. एकविसाव्या शतकात ज्ञानाची अनुभूती मिळणार आहे. भारतातील सर्व विद्यापीठांत यावर संशोधन सुरू असून खूप संधी आहेत. नॅनोटेक्नॉलॉजी एक स्वप्नवत भविष्य असून २१ व्या शतकातील अनुभूती आहे, असे स्पष्ट मत शिवाजी विद्यापीठाचे डॉ. प्रमोद कसबे यांनी व्यक्त केले. उत्तूर (ता. आजरा) येथील पार्वती-शंकर विद्यालयातील बालवैज्ञानिक संमेलनाच्या सांगता कार्यक्रमप्रसंगी ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. कसबे म्हणाले, नॅनो तंत्रज्ञानाचे जनक डॉ. रिचर्ड स्मेमन आहेत. अतिसूक्ष्म पदार्थ किंवा यंत्र बनवून त्याचा व्यवहारात वापर करणे म्हणजे नॅनो तंत्रज्ञान. योग्य ते अणू-रेणू जुळवले पाहिजे ते पदार्थ किंवा तंत्र तयार करणे ही नॅनो संकल्पना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दोन दिवसीय बालवैज्ञानिक संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांचे प्रयोग सादरीकरण झाले. त्यानंतर विजय गावडे व प्रशांत मांडके यांचे जलव्यवस्थापन व शेती नियोजन यावरील सादरीकरण पार पडले. स्वागत बालवैज्ञानिक संमेलन समन्वयक पी. एस. पंजारे यांनी केले. संमेलनाकरीता प्राचार्य डॉ. दिनकर घेवडे, संस्था उपाध्यक्ष विश्वनाथ करंबळी, संचालक विजय सावेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

राष्ट्रीय विज्ञान दिन : शिवाजी विद्यापीठात प्रदर्शन रंगले

## 'नॅनोमटेरिअल'च्या उपयोगाची मिळाली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात सुरुवाती आयोजित प्रदर्शनात विद्यार्थी विविध संशोधन प्रकल्प सादर केले.

'विज्ञानफेरी'तून जनजागृती

## विद्यापीठास संशोधनासाठी पाच कोटी

### केंद्राच्या बूस्टर योजनेतून निधी मिळणारे राज्यातील एकमेव



डॉ. पाटील



कोल्हापूर, ता. १९ : केंद्र सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या 'बिल्डर' (बूस्ट टू युनिव्हर्सिटी इंटरडिसिप्लिनरी लाइफ सायन्स डिपार्टमेंट्स फॉर एज्युकेशन ॲंड रिसर्च प्रोग्राम) योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठाला संशोधनासाठी पाच कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या योजनेअंतर्गत निधी प्राप्त करणारे विद्यापीठ राज्यातील एकमेव आहे.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व प्रकल्पाचे समन्वयक डॉ. पी. एस. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, जैवविज्ञानातील विविध शाखांनी एकत्रित येऊन संयुक्त प्रकल्प करावेत व त्यातून भरीव संशोधन आकाराला यावे, असा योजनेचा हेतू आहे. विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र, नॅनोसायन्स व तंत्रज्ञान आणि बायोइन्फॉर्मेटिक्स विद्याशाखांनी सूक्ष्म सजीवांपासून उपयुक्त नॅनो कणांच्या निर्मितीचा प्रकल्प सादर केला.

हा पंचवार्षिक प्रकल्प मंजूर होऊन त्यासाठी पाच कोटींचा निधी प्राप्त होणार आहे. तो उपयुक्त, आधुनिक सामग्री व उपकरणे घेण्यासाठी वापरता येणार आहे.

पान १० वर ≫

## नॅनोतंत्रज्ञान दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग

• डॉ. प्रमोद कसबे यांचे प्रतिपादन

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS

# अमर्याद संधींचा राजमार्ग : नॅनोसायन्स

प्रा. प्रमोद कसबे



नॅनोसायन्स आणि त्यावर आधारलेले नॅनो तंत्रज्ञान यामुळे भविष्यात अनेक नवनवीन स्वरूपात तसेच आश्चर्यकारक गोष्टींची अनुभूती अवघ्या जगाला होणार आहे. ...

---

पुढारी

# स्पर्शविरहित स्वयंचलित तापमापक यंत्राची निर्मिती

## कोरोना काळात शिवाजी विद्यापीठ नॅनो सायन्स विभागाच्या संशोधनाला यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाकडून कोरोना विषाणूच्या संक्रमणाला आळा घालण्यासाठी उपयुक्त असा स्पर्शविरहित स्वयंचलित तापमापक यंत्राची निर्मिती करण्यात आली आहे. गेल्या महिन्यातच या अधिविभागाच्या सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्सच्या संशोधकांनी सादर केलेल्या 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे'च्या संशोधनानंतर हे आणखी एक महत्त्वाचे संशोधन विद्यापीठाच्या संशोधकांनी तयार केले आहे.

कोरोना विषाणूपासून बचाव, सुटका, प्रतिबंध व नियंत्रणासाठी जगभरात संशोधकांचे प्रयत्न सुरू आहेत. त्याच अनुषंगाने विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील संशोधक प्राध्यापकांनी अथक परिश्रम घेऊन संशोधन केले आहे.

नॅनो सायन्स व तंत्रज्ञान



अधिविभागातील सहायक प्राध्यापक व संशोधक डॉ. तुकाराम डोंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पर्शविरहित स्वयंचलित तापमापक उपकरणाची कार्यप्रणाली ही जागतिक आरोग्य संघटनेने कोविडसाठी ठरवून दिलेल्या मानकांवर आधारलेली आहे. एखाद्या व्यक्तीच्या तापमानाची नोंद निर्धारित तापमानापेक्षा अधिक झाली, तर हे उपकरण अलार्मच्या माध्यमातून त्याची सूचना देते. जेणेकरून पुढील योग्य त्या दक्षतेसाठी त्याची मदत होते.

**असे आहे तंत्रज्ञान...**

हे यंत्र सेन्सर तंत्रज्ञानावर आधारित असून यात अल्ट्रासोनिक आणि इन्फ्रारेड असे दोन्ही प्रकारचे सेन्सर्स वापरले आहेत. अल्ट्रासोनिक सेन्सर समोर आलेली व्यक्ती आणि यंत्रामधले अंतर ओळखते आणि मायक्रो कंट्रोलरला संकेत पाठविते. मायक्रोकंट्रोलर पुढे इन्फ्रारेड सेन्सरला त्या व्यक्तीचे तापमान मोजण्यासाठी एक संकेत पाठवतो. त्यानुसार सेन्सरी डेटा मिळाल्यानंतर मायक्रोकंट्रोलरमध्ये त्या डेटावर प्रक्रिया होऊन एलसीडी डिस्प्लेवर संबंधित व्यक्तीचे तापमान दर्शविले जाते. व्यक्तीचे तापमान जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्धारित निकष पातळीहून अधिक नोंद झाले असेल तर लगेच अलार्म वाजतो आणि लाल रंगाची एलईडी लाईट लागते. या यंत्राची बॅटरी एकदा पूर्ण चार्ज केल्यानंतर किमान ५ दिवस कार्य करते.

यातील महत्त्वाची बाब म्हणजे हे यंत्र मानवी हस्तक्षेपाशिवाय चालत असल्याने स्वतंत्र व्यक्तीकडून तापमानाचे सतत मापन व निरीक्षण करण्याची आवश्यकता भासत नाही. साहजिकच एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे होणारे रोगसंक्रमण टाळण्यासाठी हे उपकरण उपयुक्त ठरते. त्यामुळे तापमान मोजणाऱ्या आशा वर्कर्स, नर्सेस, डॉक्टर्स तसेच सार्वजनिक ठिकाणी तत्सम सेवा देणारे स्वयंसेवक यांना होऊ शकणाऱ्या रोगसंक्रमणापासून वाचवता येऊ शकेल. बॅटरीवर कार्यान्वित होणारे हे स्पर्शविरहित यंत्र कोठेही सहज ठेवले जाऊ शकते. विविध कार्यालये, हॉस्पिटल्स, शाळा, कॉलेजेस, विद्यापीठे, मॉल्स व इतर सार्वजनिक ठिकाणी हे उपकरण उपयुक्त ठरू शकते. या यंत्राच्या व्यापक निर्मितीसाठी विद्यापीठाने काही उद्योगसमूहांशी संपर्क साधला असून लवकरच ते अल्पदरात सर्वत्र उपलब्ध होईल, अशी माहितीही डॉ. डोंगळे यांनी दिली आहे.

नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक व संशोधक डॉ. तुकाराम डोंगळे यांनी इचलकरंजी येथील प्रा. परेश मट्टीकल्ली यांच्या सहकार्याने 'स्पर्शविरहित स्वयंचलित तापमापक यंत्र' विकसित केले आहे. 'मुख्यतः हे यंत्र कोविड योद्ध्यांमध्ये वाढणाऱ्या संक्रमणाला आळा घालण्यासाठीच्या प्रतिबंधात्मक गरजा लक्षात घेऊन विकसित केले असल्याची माहिती डॉ. डोंगळे यांनी दिली आहे.

दरम्यान, अधिविभागाच्या 'सेंटर फॉर नॅनोफॅब्रिक्स'चे सहयोगी प्राध्यापक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' तंत्रज्ञानाची निर्मिती केली. त्याचे देशभरात सर्वस्तरीय कौतुक व स्वागत झाले. लवकरच हे उत्पादन 'इकोवायन्स इनोवेशन्स' कंपनीमार्फत सर्वत्र उपलब्ध होणार असल्याची माहितीही विभागामार्फत देण्यात आली आहे.

Kolhapur Edition
Aug 18, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

---

# विद्यापीठात 'स्मार्ट नॅनो फायबर'वर संशोधन

## स्कूल ऑफ नॅनो सायन्स अ‍ॅण्ड बायो टेक्नॉलॉजी विभागाला संशोधनासाठी रूसा अंतर्गत १ कोटींचा निधी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर





**इको फ्रेंडली स्मार्ट नॅनो फायबर म्हणजे काय?**

**टेक्सटाईल मिलसाठी उपयोगी**

**नॅनो तंतूचे ५० टक्के काम पूर्ण**

**नॅनो तंत्रज्ञानाने जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती**



डॉ. प्रमोद कसबे

## Extension Activity: Awareness about Nanotechnology in Science Exhibitions

# नॅनोतंत्रज्ञान दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग

वार्ताहर
उत्तूर

जेथे जाल तेथे नॅनोतंत्रज्ञान आहे. फूड टेक्नॉलॉजी, कागद निर्मिती यामध्ये हेच तंत्र वापरले जाते. नॅनोतंत्र हे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲन्ड बायोटेक्नॉलॉजी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रमोद कसबे यांनी व्यक्त केले.

**▪ डॉ. प्रमोद कसबे यांचे प्रतिपादन**

उत्तूर येथील पार्वती-शंकर विद्यालयाच्या १७ व्या बालविज्ञान संमेलनामध्ये दूरदृष्यप्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

दुसऱ्या सत्रामध्ये पार्वती-शंकर विद्यालयाच्या २८ विद्यार्थ्यांनी गटागटाने छोटे प्रयोग सादर केले. तिसऱ्या सत्रामध्ये जलव्यवस्थापन या विषयावर वॉटरलॅब सोल्युशन प्रा. लि. पुणेचे संस्थापक विजय गावडे व सल्लागार प्रशांत मांडके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सतरावे बालवैज्ञानिक संमेलन कोरोनाच्या नियमांचे पालन करून घेण्यात आले. ऑनलाईन प्रक्रियेद्वारे या संमेलनाचा लाभ अनेकांनी घरबसल्या घेतला. संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रा. दिनकर घेवडे, पी. एस. वंजारे, अशपाक शिकलगार यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. त्यांना संस्थेचे उपाध्यक्ष विश्वनाथ करंबळी यांचे मार्गदर्शन लाभले.




# नॅनो टेक्नॉलॉजी एक स्वप्नवत भविष्य : डॉ. कसबे

## उत्तूर येथील पार्वती-शंकर विद्यालयातील बालवैज्ञानिक संमेलनाची सांगता

**उत्तूर : पुढारी वृत्तसेवा**

नॅनो तंत्रज्ञान आज रुजत आहे. एकविसाव्या शतकात ज्ञानाची अनुभूती मिळणार आहे. भारतातील सर्व विद्यापीठांत यावर संशोधन सुरू असून खूप संधी आहेत. नॅनोटेक्नॉलॉजी एक स्वप्नवत भविष्य असून २१ व्या शतकातील अनुभूती आहे, असे स्पष्ट मत शिवाजी विद्यापीठाचे डॉ. प्रमोद कसबे यांनी व्यक्त केले. उत्तूर (ता. आजरा) येथील पार्वती-शंकर विद्यालयातील बालवैज्ञानिक संमेलनाच्या सांगता कार्यक्रमप्रसंगी ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. कसबे म्हणाले, नॅनो तंत्रज्ञानाचे जनक डॉ. रिचर्ड स्पेमन आहेत. अतिसूक्ष्म पदार्थ किंवा यंत्र बनवून त्याचा व्यवहारात वापर करणे म्हणजे नॅनो तंत्रज्ञान. योग्य ते अणू-रेणू जुळवले पाहिजे ते पदार्थ किंवा तंत्र तयार करणे ही नॅनो संकल्पना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दोन दिवसीय बालवैज्ञानिक संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांचे प्रयोग सादरीकरण झाले. त्यानंतर विजय गावडे व प्रशांत मांडके यांचे जलव्यवस्थापन व शेती नियोजन यावरील सादरीकरण पार पडले. स्वागत बालवैज्ञानिक संमेलन समन्वयक पी. एस. वंजारे यांनी केले. संमेलनाकरिता प्राचार्य डॉ. दिनकर घेवडे, संस्था उपाध्यक्ष विश्वनाथ करंबळी, संचालक विजय सावेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## Awareness about Nanoscience and Nanotechnology through newspaper article in the special edition of Daily Sakal (Belgaum Edition) about educational affairs named "EduCon"







**Published on Wednesday, 30 June 2021**

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे १० विद्यार्थी नामांकित संशोधन संस्थांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# ‘नॅनो सायन्स’चे विद्यार्थी विविध कंपन्यांत प्रशिक्षणासाठी रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे १० विद्यार्थी भारतीय अवकाश संशोधन संस्थेसह (इस्रो) विविध आघाडीच्या नामांकित संशोधन संस्था व कंपन्यांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी बुधवारी त्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी'च्या पाच वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या अखेरच्या वर्षी विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाचा संशोधन प्रकल्प किंवा विविध कंपन्यांत प्रशिक्षण करावयाचे असते. या अंतर्गत यंदाच्या शैक्षणिक वर्षात पहिल्या निवड यादीत एकूण दहा विद्यार्थ्यांची संशोधन प्रकल्प तसेच कंपनी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. यात इस्रो (बेंगळूर)- साक्षी निगवेकर, एन. सी. एल. पुणे - अबोली शिंदे, अमित बिरजे, मृदुला धेंडे, रिना सौबम, विनायक निर्मळे, केमसाय इनोव्हेशन पुणे - अभिलाषा देशपांडे, प्रतीक्षा भागनगोल, ऋतुजा चौगुले, प्रो-केअर क्रॉप सायन्स सांगली - सृष्टी काडगे यांचा समावेश आहे.

My Kolhapur Edition
Aug 8, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# कदम, शिंगटे जाणार संशोधनासाठी परदेशी

## शिवाजी विद्यापीठातील नॅनो सायन्सच्या विद्यार्थिनी



कदम



शिंगटे

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील अपराजिता ज्ञानेश्वर कदम (अपशिंगे, सातारा) आणि रेश्मा शिवाजी शिंगटे (जैनवाडी, सोलापूर) यांची परदेशात संशोधनासाठी निवड झाली. दक्षिण कोरिया व ऑस्ट्रेलिया येथील जागतिक क्रमवारीत अव्वल विद्यापीठांमध्ये पीएच.डी. करण्याची त्यांना संधी मिळाली.

कोविड संसर्ग ओसरत असतानाच विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणाची कवाडे नव्याने खुली होत आहेत. नॅनो सायन्समधील अपराजिता कदम आणि रेश्मा शिंगटे यांनी २०२१ मध्येच एम.एस्सी.ची पदवी प्राप्त केली. अपराजिता यांची दक्षिण कोरियातील सुंगक्युनक्वान विद्यापीठात वार्षिक १ अब्ज ५६ लाख कोरियन वोन (अंदाजे रुपये १० लाख) इतक्या विद्यावेतनासह पीएच.डी. करणार आहेत.

रेश्मा यांची ऑस्ट्रेलियातील जागतिक क्रमवारीत १९३ व्या स्थानी असलेल्या वोलन्गाँग विद्यापीठामध्ये वार्षिक २८,८५४ ऑस्ट्रेलियन डॉलर्स (अंदाजे रुपये १६ लाख) इतक्या भरघोस विद्यावेतनासह पीएच. डी. संशोधनासाठी प्रवेश मिळाला आहे. विद्यार्थिनींना संशोधन प्रकल्प मार्गदर्शक, डॉ. आरिफ शेख यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

Kolhapur, Main
25/05/2022 Page No. 2

→ दृष्टिक्षेपात
सकाळ
१९ एप्रिल २०२३

# नॅनोसायन्स विभागातील तीन विद्यार्थिनींना ‘समर रिसर्च फेलोशिप’



आकांक्षा माने



गायत्री पाटील



उजमा फरास

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील तीन विद्यार्थिनींची इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस, बेंगलोर यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित समर रिसर्च फेलोशिपसाठी निवड झाली आहे. या फेलोशिप अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना भारतातील आघाडीच्या शिक्षण आणि संशोधन संस्थांमध्ये दोन महिने संशोधन करण्यासाठी बोलावले जाते. या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळते. निवड झालेल्या विद्यार्थिनी बी. एस्सी., एम.एस्सी., नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. त्यातील आकांक्षा कृष्णात माने (चोपडेवाडी, सांगली) हिची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बेंगलोर येथे निवड झाली आहे. गायत्री सुधाकर पाटील (भादोले, कोल्हापूर) आणि उजमा अंजुम फरास (कोल्हापूर ) यांची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मंडी, हिमाचल प्रदेश येथे निवड झाली आहे. त्यांना अधिविभागातील डॉ. सुशीलकुमार जाधव, योजना पाटील, मुकेश पाडवी यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा अभिनंदन केले.

# नॅनो सायन्सचे विद्यार्थी इस्त्रोच्या भेटीवर

## एक वर्षाचे प्रशिक्षण; प्र-कुलगुरूंनी दिल्या शुभेच्छा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे दहा विद्यार्थी आज भारतीय अवकाश संशोधन संस्थेसह (इस्रो) विविध आघाडीच्या नामांकित संशोधन संस्था व कंपन्यांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आज त्यांना शुभेच्छा दिल्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्सचे विद्यार्थी इस्रो संस्थेत प्रशिक्षणासाठी जाणार आहेत. प्र-कुलगुरू पी.एस.पाटील यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. सोबत संचालक डॉ. शर्मा.

विद्यापीठातच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या पाच वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या अखेरच्या अर्थात पाचव्या वर्षी विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाचा संशोधन प्रकल्प किंवा विविध कंपन्यांत प्रशिक्षण करावयाचे असते. त्याअंतर्गत यंदाच्या शैक्षणिक वर्षात पहिल्या निवड यादीत एकूण दहा विद्यार्थ्यांची संशोधन प्रकल्प तसेच कंपनी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांनी स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे माजी संचालक आणि शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांनी या संधीचा आपली कारकीर्द घडविण्यासाठी पुरेपूर वापर करावा, अशा शब्दांत प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सदिच्छा दिल्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा आणि अधिविभागातील वरिष्ठ संशोधक सहयोगी डॉ. शरद पाटील उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांना अधिविभागातील अॅडजंक्ट प्राध्यापक डॉ. प्रकाश वडगांवकर (मानद शास्त्रज्ञ, सीएसआयआर-एनसील, पुणे) यांचे मार्गदर्शन लाभले.

### विद्यार्थ्यांची नावे अशी

इस्रो (बेंगलोर) - साक्षी निगवेकर, एन.सी.एल., पुणे : अबोली शिंदे, अमित बिरजे, मृदुला धेंडे, रिना सौबम, विनायक निर्मळे. केमसाय इनोव्हेशन, (पुणे) - अभिलाषा देशपांडे, प्रतीक्षा पागनगोल, ऋतुजा चौगुले. प्रो-केअर क्रॉप सायन्स (सांगली) - सृष्टी काडगे.

---

पुढारी



सागर गावंडे



प्रतीक कळविकट्टे

# सागर गावंडे, प्रतीक कळविकट्टे यांची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील विद्यार्थी सागर संतोष गावंडे (रा. अकोला) आणि प्रतीक मारुती कळविकट्टे (रा. कोल्हापूर) यांची देशातील नामांकित व अग्रेसर संस्थांमध्ये पीएच.डी.साठी निवड झाली आहे.

सागर यांची निवड आयआयएसइआर, मोहाली येथे 'जैविक विज्ञान' या विषयामध्ये तर प्रतीक यांची आयआयटी, मुंबई येथे 'ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी' या विषयामध्ये एकात्मिक पीएच. डी. साठी निवड झाली आहे. दोघांना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur Edition
Aug 11, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

---

सकाळ

## राष्ट्रीय पेटंट : विद्यापीठातील डॉ. किरण पवार, मेघा देसाई यांचे संशोधन

# जैवरेणूंपासून नॅनो-धातूकण बनविणे शक्य

सकाळ वृत्तसेवा



डॉ. किरण पवार



डॉ. मेघा देसाई



### कर्करोगासाठी उपयुक्त

- कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पद्धतीला पर्याय म्हणून संशोधक नॅनो-जैवतंत्रज्ञान पद्धतीचा अवलंब करत आहेत. यामध्ये मेटल नॅनोपार्टिकल्सचा उपयोग कर्करोगपेशीविरोधक व कर्करोग औषध वितरक म्हणून केला जातो. भविष्यात उपरोक्त पद्धतीने बनवलेले मेटल नॅनोपार्टिकल्स हे नॅनो-जैवतंत्रज्ञान आधारित कर्करोग उपचार पद्धतीमध्ये उपयुक्त ठरू शकतात, असे डॉ. पवार यांनी सांगितले.

---

सकाळ

# 'कॉफी विथ व्हीसी'तून विद्यापीठात गुणवंतांचे कौतुक

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा संवाद; शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्समधील डी. टी. डी. ढोंगडे यांचा शोधनिबंध इम्पॅक्ट जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्याशी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी 'कॉफी विथ व्हीसी' उपक्रमाअंतर्गत संवाद साधला. या वेळी डॉ. विलास शिंदे, प्रमोद पाटील उपस्थित होते.

> विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी उल्लेखनीय यश मिळविल्यानंतर त्यांचा विभागाकडून, नातेवाईक, मित्र-मंडळीकडून त्यांचा सत्कार व्हायचा. पण, ते ज्या ठिकाणी कार्यरत आहेत, त्या विद्यापीठाकडून त्यांचे कौतुक करण्याची विशिष्ट अशी यंत्रणा नव्हती. त्यामुळे विद्यापीठ या कुटुंबाचा प्रमुख म्हणून गुणवंतांचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता 'कॉफी विथ व्हीसी' उपक्रमाची सुरुवात केली. आता हा उपक्रम गुणवंतांचा आनंद सोहळा बनला आहे.
>
> - डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू



### कौतुकाची थाप प्रेरणा देणारी

# विज्ञानातील क्रांती, नॅनोविज्ञान आणि नॅनोतंत्रज्ञान

**नॅनोविज्ञान ज्याला अब्जांश विज्ञान किंवा अतिसूक्ष्म शास्त्र असे म्हटले जाते. या शास्त्रामुळे पुढील काही वर्षांमध्ये मानवी जीवनामध्येफार मोठे बदल घडून येणार आहेत. 'नॅनो' हा शब्द नॅनोविज्ञान व नॅनोतंत्रज्ञानामुळे नावारूपास आला. संगणक युगानंतर होत असलेल्या विज्ञान क्रांतीमध्ये नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान यांचा मोलाचा वाटा असणार आहे.**
**-डॉ. सुशीलकुमार जाधव, कोल्हापूर**

अतिसूक्ष्म विज्ञान ही संकल्पना सर्वप्रथम नोबेल पुरस्कार मिळालेले भौतिकशास्त्रज्ञ रिचर्ड फेनमन यांनी त्यांच्या १९५९ मध्ये केलेल्या भाषणात 'देअर इज प्लेन्टी ऑफ रूम अॅट दि बॉटम' अशी मांडली. नारीओ तानीगोची यांनी १९७४ मध्ये सर्वप्रथम नॅनोटेक्नॉलॉजी ही संज्ञा वापरली. रिचर्ड फेनमन यांच्या संकल्पनेतून प्रेरित होऊन के. एरिक ड्रेक्सलर यांनी स्वतंत्रपणे नॅनोटेक्नॉलॉजी ही संज्ञा आपल्या 'इंजिनिअर ऑफ क्रिएशन द कमिंग ईरा ऑफ नॅनोटेक्नॉलॉजी' या १९८६ मध्ये लिहिलेल्या पुस्तकात वापरली. एरिक ड्रेक्सलरयांचे सैद्धांतिक आणि सार्वजनिक कार्य आणि तत्कालीन ठळक प्रायोगिक विकास यातून एक संशोधन क्षेत्र म्हणून १९८० मध्ये अतिसूक्ष्मतंत्रज्ञानाचाउदय झाला.

**नॅनोविज्ञान म्हणजे काय?**

नॅनोविज्ञान हे आंतरविद्याशाखीय शास्त्र असून यामध्ये विज्ञानातील अतिसूक्ष्म घटकांचा अभ्यास केला जातो. नॅनोया शब्दाची मापन पद्धतीने व्याख्या करायची असेल तर एखाद्या पदार्थाचा एक अब्जांश अर्थात १/१००००००००० या भाग म्हणजे नॅनो होय. म्हणूनच या शास्त्राचीअब्जांश शास्त्र अशीही ओळख आहे. नॅनो विज्ञानामध्ये पदार्थांची रचना, पृष्ठभाग, वस्तुमान, आकार व आकारमान, पृष्ठभागीय बदल यांचा अभ्यास केला जातो. नॅनोविज्ञानात पदार्थांमध्ये भौतिक बदल झाला तर त्याच्या रासायनिक गुणधर्मांमध्ये बदल घडून येतात.

**नॅनो तंत्रज्ञान म्हणजे काय?**

नॅनो विज्ञानामध्ये शोधून काढलेले नवनवीन नॅनोघटक व त्यांचा मानव, निसर्ग, प्राणी इत्यादी सजीव सृष्टीसाठी केलेला वापर व त्यापासून बनवलेले नवीन-नवीन तंत्रज्ञान म्हणजे नॅनो तंत्रज्ञान होय. उदा. नॅनोऔषधे, नॅनोकपडे, नॅनोयंत्रमानव, नॅनो सिमकार्ड इत्यादी. नॅनो तंत्रज्ञानातील लक्ष्यीत औषध वितरण प्रणाली (Targeted Drug Delivery system) मुळे फक्त बाधित अवयवालाच योग्य तितक्या प्रमाणात औषध पुरवठा केला जाऊ शकतो व इतर अवयवांना होणारी हानी रोखली जाते. नॅनोतंत्रज्ञानामुळे मेमरी स्टोरेज डिवाइसेस उदा. पेनड्राईव्हस, नॅनोसिमकार्ड, नॅनोरंग, मेमरीस्टर्स, सौरघट, लवचिक डिस्प्ले, नॅनो सौंदर्यप्रसाधने, नॅनोकापड उद्योग, नॅनोवॉशिंग पावडर, क्वांटम डिस्प्ले आदी शोध लागले. त्यामुळे मानवी जीवनमान अद्ययावत, सुसह्य आणि गतिशील झाले.

**आधुनिक रसायन शास्त्रात बदल**

नॅनोउत्प्रेरक (Nanocatalyst): रासायनिक अभिक्रियेत सहभाग न घेता अभिक्रियेचा वेग वाढवणाऱ्या बाह्य पदार्थासउत्प्रेरक (Catalyst) असे म्हणतात आणि जर तो बाह्य पदार्थ नॅनो कण असेल तर त्यास नॅनोउत्प्रेरक (Nanocatalyst) असे म्हणतात. रासायनिकअभिक्रियेमध्ये सहभागी होणाऱ्या नॅनोकणांचा आकार, आकारमान, रासायनिक स्थिरता अशा अनेक गोष्टींचा अभिक्रियेच्या वेगाशी घनिष्ठ संबंध आहे.

सच्छिद्र नॅनोशोषके (Porous nanoadsorbents): शोषक म्हणजे एखादा वायू अगर द्रावण यातील विशिष्ट घटकांना स्वतःशी जोडून घेऊन त्याची संहिता कमी करणारा पदार्थ. त्याचप्रमाणे सच्छिद्र नॅनोशोषके म्हणजे वायू अगर द्रवपदार्थ यांना स्वतःकडे आकर्षित करून घेण्याची शक्ती असणारा पदार्थ म्हणजे सच्छिद्र नॅनोशोषके.

सच्छिद्र औषध वितरण प्रणाली (Porous drug delivery systems): सच्छिद्र नॅनो कणांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची औषधे भरून मानवी शरीरातील बाधा झालेल्या अवयवांपर्यंत पोचवली जाऊ शकतात. नॅनोविज्ञानातील संशोधनामुळेसच रोज विकसित होणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाले आहेत. त्यामुळे नॅनो सायन्स व नॅनो तंत्रज्ञान या आंतरविद्याशाखेचे महत्त्व वाढले आहे. तसेच भविष्यात नॅनोसायन्स व नॅनो तंत्रज्ञानावरील संशोधन एक नवीन वैज्ञानिक क्रांती घडवून आणणार यात काही शंका नाही.

सकाळ दि. १८ मे २०२२

# नॅनोटेक्नॉलॉजी ऊर्जा क्षेत्रासाठी आशेचा किरण

शेती किंवा औद्योगिक वापरासाठी लागणारी ऊर्जा मिळविण्यासाठी जे पदार्थ वस्तू वापरल्या जातात त्यांना ऊर्जा संसाधने म्हणतात. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे ऊर्जा मिळवणे, ऊर्जेला एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरूपात रूपांतरित करणे आणि ऊर्जेचा विविध कारणांसाठी वापर करणे शक्य झाले आहे. आपल्याला नैसर्गिक स्रोतांपासून ऊर्जा मिळते पण बेसुमार वापरामुळे या स्रोतांवर मर्यादा येत आहेत. अशा वेळी आपल्या मनामध्ये प्रश्नचिन्ह उभे राहते की, हे नैसर्गिक ऊर्जेचे स्रोत संपले तर पुढे काय? तर या प्रश्नाचे समर्पक उत्तर देताना, नॅनोटेक्नॉलॉजी ऊर्जा क्षेत्रासाठी आशेचा किरण ठरत आहे.

ऊर्जा निर्माण करण्यासाठी नवीन पद्धत विकसित करण्यासाठी नवतंत्रज्ञान म्हणून नॅनोटेक्नॉलॉजीचा वापर केला जात आहे. नॅनोटेक्नॉलॉजीच्या माध्यमातून नवीन वैज्ञानिक घटना आणि प्रक्रिया उदयास आल्या आहेत. यामुळे ऊर्जा पर्यावरणीय आणि शाश्वत गतिशीलतेच्या आव्हानांना क्रांतिकारक किंवा नवीन उपाय मिळाले आहेत. स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांची मागणी दिवसागणिक वाढत आहे. नॅनो-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातील ऊर्जा समस्यांवर किफायतशीर आणि पर्यावरणीयदृष्ट्या आशेचा किरण दिसत आहे. बॅटरी, कॅपॅसिटर आणि जैवइंधन यासारख्या पर्यायांना इंधन किंवा ऊर्जा साठवण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विकास पेट्रोलियम आधारित स्रोतांसाठी मजबूत दावेदार म्हणून उदयास येत आहेत. या नवीन तंत्रज्ञानामध्ये ऊर्जा संचयन आणि ऊर्जा रूपांतर प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवून नॅनोमेटेरियल्स वाढत्या प्रमाणात सक्रिय भूमिका बजावत आहेत. कार्बन नॅनोट्यूब असलेल्या ईथिलीनचा वापर पवनचक्की ब्लेड बनवण्यासाठी केला जात आहे. नॅनोट्यूबने भरलेल्या ईथिलीनच्या वापरामुळे मजबूत आणि कमी वजनाचे ब्लेड तयार करणे शक्य झाले आहे. परिणामी लांब ब्लेड प्रत्येक पवनचक्कीद्वारे निर्माण होणाऱ्या विजेचे प्रमाण वाढवतात. यामुळे एकूणच पवनचक्क्यांची कार्यक्षमता वाढली आहे.



संशोधकांनी पायझोइलेक्ट्रिक नॅनोफायबर्स हे वीज निर्माण करणाऱ्या कपड्यांसाठी धागे विकसित केले आहेत. हे धागे कपडे शिवण्यासाठी पुरेसे लवचिक आहेत. हे कपडे परिधान करणाऱ्यांच्या हालचाली होणाऱ्या घर्षणाने वीज तयार करतात, ज्याद्वारे तुमचा मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांना चार्ज करता येईल.

अमेरिकेतील राईस युनिव्हर्सिटीतील संशोधक कार्बन नॅनोट्यूब असलेला वायर विकसित करत आहे ज्यात सध्या विद्युत ट्रान्समिशन ग्रीडमध्ये वापरल्या जाणाऱ्या वायर पेक्षा लक्षणीय कमी विद्युतविरोध आहे. (रिचर्ड स्मॉली यांनी वीज वितरण ग्रीडमध्ये अमुलाग्र बदल करून नॅनोटेक्नॉलॉजीच्या वापरातून हजारो मेगावॅटस वीज प्रवाहित करू शकते हे दाखवून दिले आहे.)

लिथियम बॅटरी ऊर्जा संकलनातील मैलाचा दगड

२०१९ चा रसायनशास्त्रातील नोबेल पुरस्कार लिथियम बॅटरीतील संशोधनासाठी तीन शास्त्रज्ञांना विभागून मिळाला आहे. या संशोधनामुळे पर्यावरणाला मारक पेट्रोलियमसाठी ऊर्जा उपलब्ध करणाऱ्या घटकांना हद्दपार करणे शक्य होणार आहे. सध्या मोबाईल मानवाच्या प्रमुख गरजांमध्ये समाविष्ट आहे. शरीरातील अवयवांप्रमाणे तो कायम आपल्या सोबत असतो. ही किमया लिथियम बॅटरीच्या शोधामुळे साध्य झाली आहे. लिथियम हा वजनाने खूपच हलका असून त्याची ऊर्जा साठवून ठेवण्याची क्षमता जास्त आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे विद्युत गाड्या निर्माण करण्याचा मार्ग सुकर झाला. विद्युत गाड्यांना ऊर्जा देण्याचे काम स्टेशनरीच्या लिथियम बॅटरीमध्ये आहे. विमानाच्या शतकाच्या आधी शेवटी वजनाने हलक्या व कार्यक्षम बॅटरीच्या निर्मितीमुळे दळणवळणाच्या क्रांतीची मुहूर्तमेढ रचली गेली. या बॅटरीच्या शोधामुळे इलेक्ट्रॉनिक जगतात एक नवीन पर्व सुरू झाले.

अद्वितीय गुणधर्म असलेला ग्राफीन

सन २०१० सालच्या भौतिकशास्त्रातील नोबेल कॉन्स्टँटिन आणि आंद्रे या रशियन शास्त्रज्ञांच्या जोडीला मिळाले आणि जगभरामध्ये नॅनोटेक्नॉलॉजी मधील संशोधनांची चर्चा होण्यास सुरुवात झाली. कागदापेक्षा लाखो पटीने पातळ आणि पोलादा पेक्षा कितीतरी पट मजबूत, हिऱ्याहून कठीण, पूर्ण पारदर्शक असे विलक्षण गुणधर्म असलेला 'ग्राफीन' हा पदार्थ एकदम चर्चेत आला. तंत्रज्ञानाच्या दुनियेत क्रांती घडविण्यास समर्थ असलेला आणि मूलभूत विज्ञानाला पुढे नेण्यास मदत करणारा हा शोध आहे.

ग्राफीन हे कार्बनच्या अणूंची जाळी असून त्याची रचना मधमाशांच्या पोळ्यासारखी असते. या रचनेत कार्बनच्या अणूंचे एकमेकांशी असलेले बंध मजबूत असले तरी लवचिकही असतात. त्यामुळे ग्राफीनमध्ये एकाच वेळी परस्परविरोधी गुणधर्म आढळतात. ग्राफीन हे विजेचे चांगले सुवाहक आहे. त्यामध्ये इलेक्ट्रॉन सहजपणे फिरू शकतात. ग्राफीनच्या उच्च ऊर्जा कार्यक्षमता, पारदर्शकता आणि टिकाऊपणामुळे मोठ्या प्रमाणात सौर सेल तयार करणे शक्य झाले आहे. ग्राफीन सुपर कॅपॅसिटर मोठ्या प्रमाणात ऊर्जा साठवतात आणि वेगाने चार्ज व डिस्चार्ज करू शकतात. हे सुपरकॅपॅसिटर मोबाईल उपकरणांचे सुपरफास्ट चार्जिंग करतात.

ग्राफीनमुळे भविष्यात नवनवे पदार्थ बनवून तंत्रज्ञानाच्या दुनियेत क्रांती घडविण्यासाठी शास्त्रज्ञांचे संशोधन चालू आहे. ग्राफीन हा द्विमितीय(2D) स्फटिक रचना असल्यामुळे यांत्रिकी प्रयोग करण्याची संधी शास्त्रज्ञांना मिळाली आहे. ग्राफीनच्या यासारख्या विविध गुणधर्मांचा वापर करून भविष्यासाठी स्वच्छ ऊर्जा निर्माण करण्यासाठी केला जाऊ शकतो.

**डॉ. आनंद मोहिते**
सहाय्यक प्राध्यापक,
स्कूल ऑफ नॅनो सायन्स
अधिविभाग,
शिवाजी युनिव्हर्सिटी,
कोल्हापूर.

# प्रत्येक क्षेत्र नॅनो टेक्नॉलॉजीच्या कवेत : प्रा. डॉ. जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



नॅनो टेक्नॉलॉजीचे अगणित उपयोग आजही होत आहेत व यापुढेही होत राहतील. नॅनो टेक्नॉलॉजी (अतिसूक्ष्मतंत्रज्ञान) च्या उपयोगाची यादी खूप मोठी आहे. जीवशास्त्र, जैविकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, बांधकाम, सौंदर्य प्रसाधने आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये करिअरच्या दृष्टीने फार मोठ्या संधी नॅनो टेक्नॉलॉजी व नॅनो सायन्समध्ये उपलब्ध आहेत. आजघडीला प्रत्येक क्षेत्र नॅनो टेक्नॉलॉजीच्या कवेत असून हे तंत्रज्ञान रोज नवनवीन क्षेत्रांत क्रांतिकारक बदल घडवत राहील, असे प्रतिपादन प्रा. डॉ सुशीलकुमार जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दै. 'पुढारी'चे सहायक सरव्यवस्थापक राजेंद्र मांडवकर होते.

दै. 'पुढारी' आयोजित एज्युदिशा प्रदर्शनात नॅनो टेक्नॉलॉली - संशोधनाची कवाडे उघडणारे शास्त्र या विषयावर विद्यार्थ्यांनामार्गदर्शनकरतानाजाधवम्हणाले, अनेकविध क्षेत्रांमध्ये नॅनो टेक्नॉलॉजी विषय घेऊन बॅचलर्स किंवा मास्टर्स अधिक पीएचडी केलेल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये खूप मागणी आहे. संरक्षण खाते, ऊर्जा बचत, सोलार सेल यामध्येही नॅनो तंत्रज्ञान वापरले जात असून आजच्या घडीला पोस्ट कार्डाच्या आकाराचा हार्ड ड्राईव्ह आहे. परंतु नॅनोच्या मदतीने त्यापेक्षा कित्येक पटीने लहान ड्राईव्ह लवकरच तयार होणार आहे. थोड्या जागेत अमर्याद माहितीचा साठा करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीत अनेक यशस्वी संशोधनांची मालिका सुरू असल्याचेही जाधव यांनी सांगितले.

मानवाच्या जीवनात आमूलाग्र बदल करणाराघटकम्हणजेनॅनोटेक्नॉलॉजी. जगातल्या प्रत्येक घटकाला नॅनो टेक्नॉलॉजीचा स्पर्श होतो आहे. नॅनो याचा अर्थ मीटरचा एक अब्जांश भाग एखाद्या पदार्थाच्या अणु-परमाणूंच्या मांडणीचा विचार करून आपल्याला हव्या त्या गुणधर्माचे पदार्थ बनवण्याची क्षमता नॅनो टेक्नॉलॉजीचं तंत्रज्ञान देऊ शकते. नॅनो गारमेंट या कपड्यांवर धूळ कमी बसते. इतकेच नाही तर नॅनो मेडिसिन, नॅनो रोबोटस् यांच्या सहाय्याने वैद्यकीय शास्त्रात आमूलाग्र बदल होत आहे आणि त्याचे दृश्य स्वरूप लवकरच पाहायला मिळेल, असेही जाधव म्हणाले.

सकाळ

# दक्षिण कोरियातील संशोधक घेणार विद्यापीठात धडे

## नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमध्ये प्रशिक्षण

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २५ :** ब्रेन कोरिया-२०२२ या शिष्यवृत्ती उपक्रमाच्या माध्यमातून जेजू नॅशनल युनिव्हर्सिटी, दक्षिण कोरिया येथील तीन विद्यार्थी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात संशोधनाचं प्रशिक्षण घेण्यास आले आहेत.



त्यांमध्ये तिकडे संशोधन शिक्षण घेत असणाऱ्या महेश चौगुले, स्वप्निल पाटील या भारतीय विद्यार्थ्यांसोबतच जुंगमिन किम या दक्षिण कोरियाच्या संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. हे विद्यार्थी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रामच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात शिकण्यासाठी आलेले असून हे विद्यार्थी प्रामुख्याने 'सिग्नल प्रोसेसिंग अँड मशीन लर्निंग' या विषयाचे शिक्षण घेत आहेत.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नानोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमधील सहायक प्राध्यापक डॉ. तुकाराम डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ते काम करणार आहेत. त्यांच्या संशोधनाचं काम सिग्नल प्रोसेसिंग, मशीन लर्निंग, तसेच इंटरनेट ऑफ थिंग्स हे असून विद्यार्थ्यांच्या या शिक्षणाचा संपूर्ण खर्च 'गव्हनमेंट ऑफ साऊथ कोरिया' करीत आहे. स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्रॅममुळे शिवाजी विद्यापीठाचे नाव पुन्हा एकदा जागतिक स्तरावर गेले आहे. उपक्रमासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत तसेच विद्यापीठाच्या इंटरनॅशनल स्टुडंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. ए. व्ही. घुले यांचे सहकार्य लाभले.

Kolhapur, Main
26/06/2022 Page No. 6



कोल्हापूर : कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्कूल ऑफ नॅनो सायन्स, डीएसटी-सैफ सेंटरला भेट देऊन तेथील संशोधन, उपकरणांची माहिती जाणून घेतली.

# इंग्लंडच्या कंपनीने घेतली विद्यापीठातील संशोधनाची दखल

**कोल्हापूर, ता. ५ :** इंग्लंडमधील ईस्पी लिमिटेडने शिवाजी विद्यापीठातील संशोधनाची दखल घेतली. या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्कूल ऑफ नॅनो सायन्स, डीएसटी-सैफ सेंटरला भेट देऊन तेथील संशोधन, उपकरणांची माहिती जाणून घेतली. विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीचे औद्योगिक भागीदार सेराफ्लक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आहे.

या कंपनीच्या महत्त्वाच्या औद्योगिक समस्येच्या निरसनासाठी डॉ. किरणकुमार शर्मा यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या टीमचे संशोधन सुरू आहे. त्यातूनच एका विशिष्ट अशा महत्त्वपूर्ण उत्पादनाचे संशोधन आणि निर्मिती होत आहे. त्या उत्पादनाच्या मूलघटकांची गुणधर्मतपासणी सैफ सेंटर आणि पदार्थविज्ञान अधिविभाग यांच्या साहाय्याने होत आहे. त्याअनुषंगाने ईस्पी लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डेव्हिड कॅरिस्टन, 'सेराफ्लक्स'चे चेअरमन संजीव तुंगतकर, आदींनी विद्यापीठाला भेट दिली. त्यांनी प्रयोगशाळांना भेट दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी संवाद साधला. नॅनोसायन्स अधिविभागातील शास्त्रीय उपकरणे आणि संशोधन प्रक्रियेची माहिती डॉ. शर्मा यांनी दिली. विद्यापीठातील संशोधन, उपकरणांबाबत कॅरिस्टन यांनी समाधान व्यक्त केले. इंग्लंडमधील अधिकाऱ्यांची भेट शिवाजी विद्यापीठ आणि नॅनोटेक्नॉलॉजी आणि त्या तंत्रज्ञानावर आधारित लोकल ते ग्लोबल कंपन्यांसाठी महत्त्वाची ठरेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला. डॉ. आर. जी. सोनकवडे, के. वाय. राजापुरे, डॉ. ठकार, डॉ. सपली, पी. डी. राऊत, एस. बी. सादळे, एस. डी. डेळेकर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात संशोधनास उपयुक्त पर्यावरण

## इंग्लंडच्या शिष्टमंडळाचे कौतुकोद्‌गार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील वैज्ञानिक उपकरणे व साधने ही अत्याधुनिक स्वरूपाची असून अद्ययावत संशोधनासाठी अतिशय उपयुक्त पर्यावरण आहे, असे कौतुकोद्‌गार इंग्लंड येथील एस्पी उद्योग समूहाच्या शिष्टमंडळाने काढले.

शिष्टमंडळाने नुकतीच विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागात स्थापित सेराफ्लक्स कंपनीच्या वैज्ञानिक उपकरणांच्या प्रात्यक्षिकाच्या पाहणीसह पदार्थविज्ञान अधिविभाग, सैफ-डीएसटी केंद्र येथील संशोधनपूरक उपकरणे व सुविधांची पाहणी केली.

नॅनोसायन्स अधिविभागातील शास्त्रीय उपकरणे व संशोधन प्रक्रियेबाबत डॉ. के. के. शर्मा यांनी माहिती दिली. त्यानंतर पदार्थविज्ञान अधिविभाग येथे डॉ. के. वाय. राजपुरे व डीएसटी-सैफ केंद्र येथे डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या नेतृत्वाखाली शास्त्रीय तथा तांत्रिक सुविधा, अद्ययावत उपकरणांच्या प्रयोगशाळांची त्यांनी पाहणी केली. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह विद्यापीठातील प्रमुख अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

Edition
Mar 6, 2023 Page No.
newspaper.pudhari.co.in

## स्कूल ऑफ नॅनो सायन्समध्ये राष्ट्रीय परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इंडियन सोसायटी फॉर रेडिएशन अँड फोटो केमिकल सायन्सेस (इस्राप) मुंबई व महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस कोल्हापूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाचे उद्घाटन प्र. कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांनी केले. त्यांनी बीएआरसी व शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांचे एकत्रित प्रकल्प, त्याचा विद्यार्थ्यांना फायदा या विषयावर मार्गदर्शन केले.

'बीएआरसी'च्या शास्त्रज्ञांनी विद्यापीठातील विविध विभागास भेट देऊन प्रध्यापकासोबत चर्चा केली. परिसंवादामध्ये भाभा अणू संशोधन केंद्रातून सात, पुण्यातील तीन व विद्यापीठातील एका शास्त्रज्ञाने मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. अविनाश कुंभार व डॉ. बिना सिंग यांनी इस्राप सोसायटीची उद्दिष्टे सांगितली. परिसंवादाचे प्रा. किरणकुमार शर्मा, निमंत्रक डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले.

## 'नॅनो सायन्स, टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' विषयावर २७ जुलैपासून व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे २७ ते ३० जुलै या कालावधीत 'नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' विषयावर मोफत ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. व्याख्यानमाला बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आहे. यात तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी या विशेष संधीचा विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

पुढारी

## विद्यापीठात आजपासून कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागात दि. १५ व १६ मे रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी ओपन डे' कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळा बारावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आहे. याततज्ज्ञप्राध्यापकांसोबतचर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण संशोधनाची प्रात्यक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटी यांचा अंतर्भाव आहे. कार्यशाळेत उपस्थितांना प्रायोगिक संशोधन कार्याची प्रात्यक्षिके पाहावयास मिळणार आहेत. अशी माहिती अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली आहे.

जाहीर ईशारा

या जाहीर ईशाऱ्याने तमाम लोकांना व वित्तीय संस्थांना कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा कोल्हापूर पोट तुकडी व तहसील करवीर, मे. दुय्यम निबंधकसो करवीर यांचे अधिकार क्षेत्रातील कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील रि. स. नं. ११७ व ११८ या मिळकतीवरती श्री. भवानी सहकारी गृहनिर्माण संस्था, देवकर पाणंद, कोल्हापूर यांनी सभासदांकरिता विकसित केलेल्या मिळकतीवरील प्लॉट नं. ५२ याचे एकूण क्षेत्र २११.९ चौ. मी. या मिळकतीचे प्लॉट नं. ५२ अ व ५२ ब असे विभाजन करून दोन प्लॉट केले असून त्यापैकी प्लॉट नं. ५२ ब याचे एकूण क्षेत्र १४७.२२ चौ. मी. यावरती असलेले सिंगल स्लॅब, वीट, मातीचे बांधकामासहची मिळकत यांसी चतु:सीमा - पूर्वेस - प्लॉट नं. ५३ ची मिळकत, पश्चिमेस - ३० फुटी रस्ता, दक्षिणेस - ४० फुटी कॉलनी रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ५२ अ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकत. सदर मिळकतीबाबत

My Kolhapur Edition
May 15, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

सकाळ

## 'नॅनो सायन्स'तर्फे १५, १६ ला कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागात १५ व १६ मे दरम्यान सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी ओपन डे' कार्यशाळा होत आहे. कार्यशाळा मुख्यतः १२ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित केली असून त्यात तज्ज्ञ प्राध्यापकांसोबत चर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण संशोधनाची प्रात्यक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटी यांचा अंतर्भाव असणार आहे.

प्रतिजैविक क्रिया, मेमरिस्टर्स, गॅस सेन्सिंग, लोटस सुपरहायड्रोफोबिक इफेक्ट, नॅनो फायबर्स, अँटी रस्ट कोटिंग स्प्रे, व्हायरस कवच स्प्रे, डिटॉक्सिफिकेशन, चुंबकीय लोलक, टोटल इंटरनल रिफ्लेक्शन, एसी मोटर, ऑप्टिकल इल्युजन पाहायला मिळणार आहे. तरी त्यात विद्यार्थी व पालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

Kolhapur, Main
08/05/2022 Page No. 5

सकाळ

## 'रूसा'अंतर्गत ५२ कोटी होणार जमा; उच्च शिक्षणातील संशोधनालाही प्रोत्साहन

# नावीन्यपूर्ण उपक्रमांना मिळणार गती

**संतोष मिठारी**: सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रूसा) योजनेंतर्गत एकूण ५२ कोटी ४७ लाख २० हजार ८३३ रुपये राज्य प्रकल्प संचालनालयाकडे जमा होणार आहेत. त्याला राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. या रकमेतून राज्यातील विविध ३७ महाविद्यालय, विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांना निधी मिळेल. त्यामुळे एकूणच उच्च शिक्षणातील संशोधन, नावीन्यपूर्ण उपक्रमांना गती मिळणार आहे.

> 'रूसा'अंतर्गत शिवाजी विद्यापीठात स्थापन केलेल्या संशोधन केंद्राला मंजूर झालेला उर्वरित ८० लाखांचा निधी मिळाला. त्यातून मेमरी कार्ड, कृत्रिम बुद्धिमत्ता डिव्हाईस, व्हीएलएसआय इंटिग्रेशनबाबतच्या संशोधनाला बळ मिळाले आहे.
>
> **-तुकाराम डोंगळे,** सहप्रकल्प प्रमुख, रूसा सेंटर



उच्च शिक्षणाची गुणवत्ता व पाया सबलीकरणासाठी 'रूसा' योजना राबविली जाते. त्याअंतर्गत राज्यातील अकृषी विद्यापीठे व शासकीय संस्थांना अनुदान वितरीत करण्याचे केंद्र आणि राज्याचे प्रमाण ६०:४० असे आहे. त्यानुसार संशोधन व नावीन्यपूर्ण उपक्रम या घटकांअंतर्गत 'रूसा'च्या राज्य प्रकल्प संचालनालयाच्या खात्यात रक्कम जमा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यात केंद्र शासनाकडून ३१ कोटी २१ लाख ६२ हजार ५०० रुपये, तर राज्य शासनाकडून २१ कोटी २५ लाख ५८ हजार ३३३ रुपये जमा होतील. त्यातून भौतिक सुविधा, संशोधन व नावीन्यपूर्ण उपक्रम, मनुष्यबळ विकास, गुणवत्तावाढीसाठी महाविद्यालय, विद्यापीठांना निधी दिला जाणार आहे.

### या महाविद्यालय, विद्यापीठांना निधी

- मॉडेल डिग्री कॉलेज (हिंगोली), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सायन्स इन्स्टिट्यूट, शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय (औरंगाबाद), श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेंटर, केएमई सोसायटी जी. एम. मोमीन वुमेन कॉलेज, सेंट झेवियर्स इन्स्टिट्यूट, नानावटी कॉलेज, पाटकर कॉलेज, व्ही. पी. वराडे कॉलेज, मिठीबाई कॉलेज, सेंट झेवियर्स कॉलेज, निर्मला निकेतन कॉलेज, बीपीसीएएस कॉलेज, इस्माईल युसूफ कॉलेज, एन. के. कॉलेज, (मुंबई), वसंतराव नाईक कॉलेज ऑफ आर्टस् (नागपूर), सावित्रीबाई फुले विद्यापीठ, परशुरामभाऊ कॉलेज, सिम्बायोसिस कॉलेज, टी. सी. कॉलेज (पुणे), शिवाजी विद्यापीठ, सायबर इन्स्टिट्यूट, शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय (कोल्हा... रामानंद तीर्थ विद्यापीठ (नांदेड), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ (लोणेरे), संत गाडगेबाबा अमरा... प्रताप कॉलेज (अमळनेर), कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय (पंढरपूर), सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज... शिवाजी कॉलेज (सातारा), न्यू मॉडेल डिग्री कॉलेज (वाशीम)

Kolhapur, Kolhapur-Today
11/03/2023 Page No. 1

## जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत विद्यापीठाचे दहा प्राध्यापक

पदार्थविज्ञानच्या ४ शिक्षकांसह २५ माजी विद्यार्थ्यांचा समावेश; स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या क्रमवारीतील मानांकन



तरुण भारत

# युनायटेड किंगडम विद्यापीठात विद्यार्थिनींची पीएच. डी.साठी निवड

कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील तीन विद्यार्थिनींची युनायटेड किंगडम आणि दक्षिण कोरियातील विद्यापीठांमध्ये उच्च विद्यावेतनासह मास्टर्स आणि पीएच.डी. साठी निवड झाली आहे. युनायटेड किंगडम मधील युनिव्हर्सिटी ऑफ शेफफिल्ड (जागतिक क्रमवारी ९६) येथे वैष्णवी सावेकर (रा. राधानगरी, कोल्हापूर) यांची सेमीकंडक्टर फोटोनिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयामध्ये मास्टर्स (पदवीत्तर) अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. दक्षिण कोरिया मधील चुंग-आंग विद्यापीठ (जागतिक क्रमवारी ३९२) येथे मधुरा देशपांडे (रा. पुणे) यांची पीएच.डी. साठी तर रोहिणी शिंदे (रा. इस्लामपूर, सांगली) यांची एम.एस्सी.-पीएच.डी. एकात्मिक अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. वैष्णवी आणि रोहिणी यांनी बी.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम २०२०-२१ मध्ये तर मधुरा यांनी बी.एस्सी.- एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (५ वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम २०१८-१९ मध्ये पूर्ण केला आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा, सर्व शिक्षकांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.





---

२१ जाने. २०२३

सकाळ

# नॅनो सायन्सच्या दोन विद्यार्थ्यांची दक्षिण कोरियात पीएच.डी.साठी निवड

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील सौरभ थोरवत (रा. मौजे कासारवाडा, राधानगरी), प्रीती शिंदे (रा. अचकनहळ्ळी, जत) यांची दक्षिण कोरिया येथील क्युंग ही आणि संक्युकवान युनिव्हर्सिटी येथे अप्लाइड फिजिक्स व केमिकल इंजिनिअरिंग याविषयातील पीएच.डी. संशोधनासाठी निवड झाली. त्यांना अधिविभागातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. सुशीलकुमार जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. सौरभ, प्रीती यांनी सन २०१७ ते २०२२ या कालावधीमध्ये बीएस्सी -एमएससी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. पदवीपासून योग्य मार्गदर्शन मिळाल्याने आणि संशोधनाची आवड निर्माण झाल्याने आम्ही हे यश मिळवू शकलो, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी संचालक डॉ. किरण कुमार शर्मा आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



सौरभ थोरवत



प्रीती शिंदे

Kolhapur, Kolhapur-Today
21/01/2023 Page No. 102

लोकमत

# स्कूल ऑफ नॅनो सायन्सचे पंधरा विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी

## दहा वर्षांत ९० विद्यार्थ्यांचे परदेशात शिक्षण; विभागाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे १५ विद्यार्थी-विद्यार्थिनी पीएच.डी.सह विविध अभ्यासक्रमांच्या उच्चशिक्षणासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थांकडे रवाना झाले.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील अनेक विद्यार्थी दरवर्षी भरघोस फेलोशिपसह पीएच.डी. तसेच आधुनिक विषयांच्या अभ्यासासाठी परदेशात जातात. २०१२-१३ मध्ये सुरू झालेल्या या नव्या अधिविभागातून आजपर्यंत ५७ पेक्षा अधिक विद्यार्थी पीएच.डी.च्या संशोधनासाठी, दहापेक्षा अधिक विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी आणि पाच विद्यार्थी पोस्ट डॉक्टरेट रिसर्च स्टडीजसाठी परदेशातल्या नामांकित विद्यापीठांमध्ये गेले आहेत. यंदाही स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे ११ विद्यार्थी पीएच.डी. साठी, दोन विद्यार्थी पोस्ट-डॉक्टरेट रिसर्चसाठी, तर दोन विद्यार्थी पदव्युत्तर पदवीसाठी ऑस्ट्रेलिया, जर्मनी, झेक रिपब्लिक, इंग्लंड तसेच दक्षिण कोरिया या देशांमधील विद्यापीठांकडे रवाना झाले.

**परदेशात गेलेले विद्यार्थी**

पीएच.डी.: प्रज्ञा पाटील, अभिषेक कुलकर्णी (ऑस्ट्रेलिया), भक्ती जाधव, अंकिता निकम, आदर्श पाटील, आशिष कणसे, रोहन हगवणे, अभिषेक चव्हाण, योगेश डांगे, ओंकार पाटील, (दक्षिण कोरिया), अपूर्वा वडणगेकर (झेक रिपब्लिक). पोस्ट डॉक्टरल रिसर्च : डॉ. सोमनाथ कुंडले, डॉ. स्नेहल पाटील (दक्षिण कोरिया). पदव्युत्तर पदवी : वैभवी जाधव (जर्मनी), विनायक निर्मळे (इंग्लंड).

Kolhapur Main
Page No. 4 Sep 23, 2023
Powered by: erelego.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
लोकमत

# 'नॅनोसायन्स'चा मेळावा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँण्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागात शनिवारी पालक मेळावा उत्साहात पार पडला. डॉ. के. के. शर्मा, डॉ. के. व्ही. खोत, डॉ. के. डी. पवार, डॉ. वाय. वाय. पाटील, डॉ. एस. ए. सावंत, एम. एन. पाडवी, डॉ. पी. जे. पाटील यांनी विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांवर मार्गदर्शन केले. डॉ. टी. डी. डोंगळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2024
पुढारी

# 'नॅनोसायन्स विद्यार्थी देश-विदेशात कार्यरत'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठामधील नॅनोसायन्स अधिविभागात शिक्षण घेतलेले विद्यार्थी देश-विदेशात विविध क्षेत्रांत कार्यरत असून, त्यांनी यश संपादन केले आहे, असे मत आयोजित पालक मेळाव्यात व्यक्त करण्यात आले.

यावेळी डॉ. के. के. शर्मा, डॉ. के. व्ही. खोत, डॉ. के. डी. पवार, डॉ. वाय. वाय. पाटील, डॉ. एस. ए. सावंत, श्री. एम. एन. पाडवी, डॉ. पी. जे. पाटील यांनी अधिविभागाच्या शैक्षणिक आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचा, संशोधन, उपलब्ध सुविधा, नोकरीच्या संधी, परीक्षा, शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियाबाबत प्राध्यापकांनी विस्तृत माहिती पालकांना दिली. अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. के. व्ही. खोत यांनी केले, तर डॉ. टी. डी. डोंगळे यांनी आभार मानले.

# मनमोहन शर्मा पुरस्काराचे डॉ. तुकाराम डोंगळे मानकरी

## मराठी विज्ञान परिषदेची घोषणाः पुरस्कार मिळविणारे शिवाजी विद्यापीठातील पहिले शिक्षक

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना मराठी विज्ञान परिषदेचा 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान-तंत्रज्ञान पुरस्कार-२०२३' पुरस्कार जाहीर झाला आहे. कमी वयात तसेच हा पुरस्कार मिळविणारे शिवाजी विद्यापीठातील ते पहिलेच शिक्षक आहेत.

एक लाख रुपये रोख, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून त्याचे वितरण मराठी विज्ञान परिषदेच्या अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात केले जाते. डॉ. डोंगळे हे स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात नॅनो-इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे तज्ज्ञ अध्यापक आहेत. त्यांचे संशोधन प्रामुख्याने मेमरी डिव्हायसेस, न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंग व कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात असून ते राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीयस्तरावर मान्यताप्राप्त आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील आघाडीच्या २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये डॉ. डोंगळे यांचा समावेश आहे. सुमारे १६० पेक्षा अधिक शोधनिबंध, ३ पुस्तके व ११ पेटंट त्यांच्या नावे नोंद आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना प्रा. मनमोहन शर्मा पुरस्कार जाहीर झाला. त्याबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी ग्रंथ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी शेजारी गजानन पळसे, विलास शिंदे, जगदीश सपकाळे, आलोक जत्राटकर उपस्थित होते.**

# तुकाराम डोंगळे यांना पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना मराठी विज्ञान परिषदेचा 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान-तंत्रज्ञान पुरस्कार' जाहीर झाला. अत्यंत कमी वयात हा पुरस्कार मिळविणारे डॉ. डोंगळे हे पहिलेच अध्यापक-संशोधक आहेत. हा पुरस्कार मिळविणारे विद्यापीठातीलही ते पहिलेच शिक्षक आहेत.



भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील ऋषितुल्य गणल्या जाणाऱ्या मुंबईतील यू.डी.सी.टी.चे निवृत्त संचालक प्रा. मनमोहन शर्मा यांच्या नावे हा पुरस्कार दिला जातो. एक लाख रुपये रोख, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. डॉ. डोंगळे यांचे मेमरी डिव्हायसेस, न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंग व कृत्रिम बुद्धिमत्ता यात संशोधन आहे. जागतिक स्तरावरील आघाडीच्या २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी त्यांना ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले.

# डॉ. हेमराज यादव यांना 'लाईफ फेलो' सन्मान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीमधील रामानुजन फेलो डॉ. हेमराज यादव यांची इंडियन केमिकल सोसायटीचे लाईफ फेलो म्हणून निवड झाली आहे. त्यांना नुकतेच याबाबतचे पत्र ई-मेलद्वारे मिळाले आहे.

अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील डॉ. हेमराज यादव यांची आयआयटी दिल्लीमध्ये झालेल्या इंडियन केमिकल सोसायटीच्या वार्षिक सभेत लाईफ फेलो म्हणून निवड केली. त्यामुळे त्यांना जागतिक स्तरावर रसायनशास्त्राच्या प्रगतीसाठी चालू असलेल्या व्यावसायिक विकास, संशोधन, सामंजस्य आणि योगदानासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. डॉ. यादव यांनी दक्षिण कोरियामध्ये ऊर्जा, पर्यावरण आणि जैव-चिकित्सा



डॉ. हेमराज यादव

या विषयांवर सात वर्षे काम केले आहे. त्यांनी सन २००६ दूधसाखर महाविद्यालय बिद्री येथून रसायनशास्त्रात पदवी, तर २००९ मध्ये शिवाजी विद्यापीठातून उपयोजित रसायनशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी घेतली. सन २०१४ डी.वाय. पाटील विद्यापीठ मधून रसायनशास्त्रात पीएच.डी. केली. पुढे त्यांनी सन २०१४ ते २०१७ दरम्यान दक्षिण कोरियाच्या सेऊल विद्यापीठात पोस्टडॉक्टोरल रिसर्च फेलो म्हणून काम केले. फोटोकॅटालिसिस, नॅनोमेटेरिल्स, बायोमेटीरल्स, ड्रग डिलिव्हरी, सुपरकॅपेसिटर, इलेक्ट्रोकेमिकल सेन्सर, गॅस सेन्सर आदी त्यांचे संशोधनाचे विषय आहेत. त्यांना इंडियन केमिकल सोसायटीचे अध्यक्ष प्रा. जी. डी. यादव यांचे मार्गदर्शन लाभले.

# नॅनो सायन्सच्या विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील विद्यार्थिनींना संशोधन, पदवी, पदव्युतर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. कस्तुरी रोकडे यांची दक्षिण कोरिया येथील इंन्चॉन नॅशनल विद्यापीठ येथे इनू सुयर लॅब व्हिजिटिंग स्टुडंट प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली आहे. एम.एस्सी भाग-१ मधील संध्या घाटगे सातारा यांना सीताराम जिंदाल फाऊंडेशनतर्फे पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. बी. एस्सी.- एम. एस्सी (एकात्मिक) भाग-१ मध्ये शिकणा-या माऊली पाटील (रा. येळवडे) यांना इंडिया बुल्स फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती जाहीर झाली. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू, प्रा. डॉ. पी. एस. पाटील. कुलसचिव व्ही. एन. शिंदे, अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी यशस्वी विद्यार्थिनिंचे अभिनंदन केले.

# 'नॅनोसायन्स'च्या तीन विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

## कस्तुरी रोकडे, संध्या घाटगे, माऊली पाटील यांचा समावेश

**■ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील तीन विद्यार्थिनींना संशोधनासाठी विविध विद्यापीठ, संस्थांकडून शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. त्यात कस्तुरी अशोक रोकडे (कोल्हापूर), संध्या अनिल घाटगे (सातारा), माऊली सुभाष पाटील (राधानगरी) यांचा समावेश आहे.

कस्तुरी हिची दक्षिण कोरिया येथील इन्चॉन नॅशनल विद्यापीठ येथे इनशुअर लॅब व्हिजिटिंग स्टुडंट प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली आहे. तिला दोन लाख रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळाली आहे. तिने



कस्तुरी रोकडे



माऊली पाटील



संध्या घाटगे

बी. एस्सी. एम. एस्सी (एकात्मिक) नॅनोसायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीची पदवी घेतली आहे. ती सध्या डॉ. टी. डी. डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. करत आहेत. एम.एस्सी भाग एकमधील संध्या हिला सीताराम जिंदाल फाउंडेशनतर्फे पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. शैक्षणिक आणि वसतिगृहाच्या खर्चासाठी तिला दरवर्षी ३३ हजार रुपये मिळणार आहेत. ही शिष्यवृत्ती दोन वर्षांसाठी आहे. बी. एस्सी.- एम. एस्सी (एकात्मिक) भाग एक मधील माऊली हिला इंडिया बुल्स फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. तिला शैक्षणिक शुल्कासाठी दरवर्षी २० हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव विलास शिंदे, प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.